PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 6

# ग्रामीण पत्रकार आणि सामाजिक मूल्य

**प्रा. रामा भिमराव रोकडे**
**मो. ९७६३५०३२४१ महाराष्ट्र भारत**

प्रस्तुत शोध निबंधात लोकशाहीचा चौथास्तंभ म्हणून ओळखल्या जाणा-या प्रसार माध्यमांच्या विश्वासार्हतेविषयी आज प्रश्नचिन्ह का निर्माण झाले ? ग्रामीण पत्रकारिता म्हणजे काय ? ग्रामीण पत्रकार कोणाला संबोधले जाते ? ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत पत्रकारितेचा सहभाग असतो काय ? ग्रामीण पत्रकारांना सामाजिक मुल्यभान असते का ? ग्रामीण पत्रकारांच्या मर्यादा इत्यादी प्रश्नांच्या उत्तरांचा प्रस्तूत शोध निबंधात घ्यावयाचा आहे.

## १. प्रसार माध्यमे आणि सामाजिक मूल्य

आजच्या जगाची ओळख समाज माध्यमांचे (सोशल मीडीया) युग म्हणून होत आहे. या सोशल मीडीयाच्या युगातील प्रत्येक व्यक्ती स्वत: ‘अपडेट’ होताना दिसतो. ताजी माहीती आणि नवे ज्ञान ग्रहण करण्यासाठी प्रत्येकजण धडपडत आहे. देशाच्या पंतप्रधानापासून शेतात राबणा-या शेतक-यांपर्यंत प्रत्येकजण आता ‘कॅशलेश’ व्यावहाराची तयारी करू लागला आहे. प्रत्येक व्यक्तीला स्थानिक गोष्टीसह आंतरराष्ट्रीय घडामोडीची उत्सुकता लागताना दिसत आहे. त्यामुळे वृत्तपत्र, आकाशवाणी आणि न्यू मीडीया ही प्रसार माध्यमे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली हे आपणाला समजले देखील नाही. प्रसार माध्यमाचा समाज जीवनावरील प्रभाव ही वाढत आहे. आज तालूका पातळीवर दैनिके, जिल्हा आणि तालुका पातळीवर टी.व्ही. चॅनल सुरू झाले आहेत. आकाशवाणी एफ.एम, कम्युनिटी रेडीओ ची संख्या वाढत आहे. या क्षेत्रात वाढत्या माध्यमांच्या बरोबरच ‘ब्रेकींग न्यूज’ ची संख्याही वाढत आहे. आज अनेक राजकीय नेते, उद्योजक व भांडवलदार या क्षेत्रात उतरले आहेत. त्यामुळे या क्षेत्रात सध्या जीव घेणी स्पर्धा सुरू आहे. लोकांचे प्रश्न, विकास, सामाजिक एकोपा, राष्ट्रप्रेम, न्याय या लोकशाही मूल्याबरोबरचे स्थान आज प्रसिध्दी, सत्ता आणि नफा मिळवणे यास प्रसारमाध्यमाच्या व्यावस्थापनाकडून मिळू लागले. त्यामुळे लोकशाहीच्या या चौथ्या स्तंभाच्या विश्वासर्हततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याचा अर्थ माध्यामांनी समाजहिताचे काम सोडले असा नव्हे. प्रस्तुत शोध निबंधात प्रसार माध्यमांच्या क्षेत्रातील वृत्तपत्रामध्ये काम करणा-या ग्रामीण पत्रकारांच्या सामाजिक मूल्य भानाचा उहापोह केला आहे.

## २. वृत्तपत्र आणि ग्रामीण पत्रकार

ग्रामीण पत्रकार (वार्ताहर) तो ज्या वृत्तपत्रामध्ये किंवा वृत्तसंस्थेमध्ये काम करतो त्या वृत्तपत्राचा तो समाजातील प्रतिनिधी असतो. तो आपल्या जनसंपर्काच्या माध्यमातून आपल्या वृत्तमान पत्रासाठी बातम्या संकलन करतो. अनंत कोळमकर यांनी वार्ताहराला " प्रसिध्दी माध्यमांचे कान व डोळा"[१] संबोधले आहे. कोळमकरांचे हे मत योग्य वाटते, कारण ग्रामीण प्रत्रकार सदैव समाजात वावरतो, त्याची नाळ ग्रामीण जीवनाशी जोडलेली असते. ग्रामीण पत्रकार आपल्या डेडलाईनच्या कार्याक्षेत्रातील घटना, विविध घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवतो. घटनास्थळ आणि माहितीचे स्त्रोत या ठिकाणी जाऊन वार्ताहराला माहितीचे संकलन करावे लागते. "घटनेतला एखादा आयाम समाज हिताला बाधा पोहचवणारा आहे काय, असेल तो कशा प्रकारे वाचकांच्या समोर मांडायचा या सा-याचा विचार बातमीदाराला या घटनेचे वृत्त संकलीत करताना करावा लागतो."[२] यातून ग्रामीण पत्रकाराला सामाजिक संबंध कसे जोपासतो आपल्या लक्षात येते. ग्रामीण पत्रकाराकडे शारीरिक व बौध्दिक क्षमता, चौकसपणा, विश्वासार्हता, निर्भीडता, तत्परता आणि त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी असावे लागते.

### ३. ग्रामीण पत्रकारिता

भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशातील सुमारे ८० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. शेती आणि शेतीपूरक व्यावसाय करून या भागातील लोक आपला उदनिर्वाह करतात. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भाग विकासापासून कोसो दूर राहीलेला दिसतो. सुरुवातीपासून ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन स्तरावर प्रयत्न झालेले दिसतात. यात माध्यमांचा सहभाग ही महत्वाचा आहे. ग्रामीण विकासाच्या जाणीवेतून ग्रामीण समाज जीवनातील विविध प्रश्न आणि घडामोडीची दखल वृत्तपत्रासह अन्य प्रसार माध्यमांनी घेतली असून ग्रामीण पत्रकारितेचे महत्व वाढले.

" ग्रामीण भागातील विषय पत्रकारितेच्या माध्यमातून मांडणे म्हणजे ग्रामीण पत्रकारिता होय. ग्रामीण भागात जो पत्रकारितेचे काम करतो तो ग्रामीण पत्रकार त्यालाच वार्ताहर देखील म्हणतात. 'ग्रामीण जीवनाचे दर्शन ज्याच्या पत्रकारितेतून दिसते तो ग्रामीण पत्रकार' ग्रामीण भागात घडणा-या घडामोडी शेती, आरोग्य, शिक्षण, राजकारण, सहकारी योजना व प्रयत्न या विषयी बातम्या देणे, त्यांचे चांगले वाईट परिणाम जनतेपुढे मांडणे, ग्रामीण भागातील सार्वजनिक कार्यकर्ते, संस्था , स्थानिक स्वराज्य संस्था, सोसायट्या, पतपेढ्या त्यातून उदयास येणारे नवे ग्रामीण नेतृत्व आदी विषय ग्रामीण पत्रकारितेच्या कक्षेत येतात. या एकंदरीत ग्रामीण जनतेच्या विकासाकाठी बातमी करणे म्हणजे ग्रामीण पत्रकारिता होय."[३]

ग्रामीण भागातील लोकांच्या प्रश्नांची मांडणी करुन लोकांचे प्रबोधन करण्याचे काम ग्रामीण पत्रकाराचे आहे. ग्रामीण भागाचा विकास हा ग्रामीण पत्रकारितेचा कणा मानला जातो. त्यामुळे आज ग्रामीण पत्रकारितेचे महत्व वाढत आहे. त्याच बरोबर ग्रामीण पत्रकारितेची जबाबदारी वाढली आहे.

**४. ग्रामीण पत्रकाराची बलस्थाने**

ग्रामीण भागातील पत्रकार(वार्ताहर) हा तो काम करत असलेल्या दैनिकाचा सामान्य माणसातील चेहरा असतो. स्वाभिमानी, वस्तुनिष्ठ लेखन करणारा, नि:पक्षपातीपणा, विशेषवृत्त लेखनाची कला, भाषाशैली हे गुण असणारा व्यक्तीच पत्रकारितेच्या क्षेत्रात टिकतो. त्याचे संभाषण कौशल्य, जनसंपर्क, त्याची सामान्य माणसातील प्रतिमा त्याचे विविध क्षेत्रातील ज्ञान, वेळेचे व्यवस्थापन यावर त्याच्या कार्याचे यशस्विता अवलंबून असते. ग्रामीण भागातील जागृत पत्रकार पुढील कामांना प्राधान्य देताना दिसतात.

१) ग्रामीण प्रश्नांना वाचा फोडणे.
२) जनमत तयार करणे.
३) लोंकांचे प्रबोधन करणे.
४) भ्रष्टाचार चव्हाट्यावर मांडणे.
५) प्रस्थापितांना वठणीवर आणणे.
६) लोकांना ज्ञान आणि माहिती देणे.
७) विकास कामाचा पाठपुरावा करणे.

ग्रामीण पत्रकाराच्या या बलस्थानावरुनच त्याचे सामाजिक मूल्यभान आपल्या लक्षात येते.

**५. ग्रामीण पत्रकारितेच्या मर्यादा**

१. उच्च शिक्षित व प्रशिक्षित मनुष्य बळाचा अभाव.
२. ग्रामीण पत्रकारांच्या संघटनामधील गटबाजी
३. नि:पक्षपातीपणाचा अभाव,
४. पक्षीय राजकारणाला खतपाणी
५. बोगस पत्रकारांची वाढती संख्या
६. वृत्तपत्राचे व्यावसायिकरण
७. वृत्तपत्राची वाढती स्पर्धा
८. वैयक्तिक हितसंबंध जोपासण

या ग्रामीण पत्रकारितेतील मर्यादामुळे ग्रामीण पत्रकार सामाजिक मूल्यांपासून दूर होताना दिसतात.

**६. सामाजिक मूल्य**

आज प्रसारमाध्यमांचा समाजजीवनावरील प्रभाव वाढतच असला तरी प्रसार माध्यमांच्या विश्वासार्हततेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. माध्यमांची नीतीमत्ता सांगताना श्रीपाद जोशी म्हणतात, " कामोत्तेजकता, हिंसा, अश्लीलता, गुन्हेगारी, हितसंबंधीयांचा प्रभाव इ. जे दर्शन समाज माध्यमातून घडविले जाते त्याच्या परिणामा बाबतची चर्चा तर सतत चाललेली असतेच असते. सा-याच पवित्र व उदात्त अशा बाबींचे स्थान माध्यमातील या प्रकारच्या दर्शनाने डळमळीत करुन टाकले अशी चर्चा सतत सुरु असतेच."[४] लोकशाही मूल्य आणि संस्कृती याचा विसर माध्यमांना होत आहे. अशी खंत विचारवंत, राजकारणी, प्रसार माध्यमातील तज्ज्ञ यांचेसह सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत, हे स्पष्ट करताना श्रीपाद जोशी म्हणतात, " पारंपरिक शहानपणा काढून घेवून या जागी या माध्यमांच्या मार्फत वेगळीच नीतीमूल्य शिरवली जात आहेत"[५] ही वस्तुस्थिती आजच्या माध्यमांचा विचार केल्यास मान्य करावी लागते.

ग्रामीण पत्रकाराच्या समाज मूल्यांचा विचार केल्यास ग्रामीण पत्रकारांची गटबाजी, त्यांच्या संघटना, निःपक्षपातीपणाचा अभाव, जिरवा-जिरविचे राजकारण, सुडाची भावना, शोध पत्रकारितेच्या आणि माहिती अधिकाराच्या आडून केली जाणारी पितपत्रकारिता, नेत्यांपुढील हुजरेगिरी, गावोगावी "तोतया" पत्रकारांची वाढती संख्या आदीमुळे ग्रामीण पत्रकारितेचे क्षेत्र झपाट्याने वाढत असतानाच तितकेच बदनाम होत आहे, याचे चिंतन ग्रामीण पत्रकार आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांनी करणे आवश्यक आहे. ग्रामीण पत्रकारितेच्या या घसरणीला वृत्तपत्र किंवा वृत्तसंस्थेचे व्यवस्थापन आणि अर्थकारण ही तितकेच जबाबदार आहेत.

ग्रामीण पत्रकारिते विषयी सुरेश शहा लिहीतात, "ग्रामीण भागातील पत्रकार हा पत्रकार म्हणून राहून शकत नाही तो त्या गावाचा एक जागरुक, कर्तव्यदक्ष, कर्तव्यतत्पर नागरिक ही असतो तो कळत न कळत एक सामाजिक कार्यकर्ता झालेला असतो...... गावच्या समस्यांना वाचा फोडण्याचे आणि त्यासाठी जनजागृती करण्याचे काम त्यालाच करावे लागते. लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी बातमीदारीचा वापर करावा लागतो."[६] आपल्या देशात अनेक नामवंत पत्रकारांच्या धारधार लेखणीमुळे ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळाली आहे हेही वास्तव आपणाला नाकारता येत नाही.

'ग्रामीण भागात पत्रकार हा अनेकांना पूजनीय असतो ही गोष्ट जितकी खरी तितकीच त्याला अनेक धमक्यांना आणि सुड भावनेलाही सामोरे जावे लागते हेही खरे आहे'[७] हे सांगून सुरेशचंद्र पाध्ये यांनी पत्रकारांच्या असुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित केला आहे. माध्यमातील सामाजिक मूल्यांचा विचार करत असताना पत्रकारांच्याही काही समस्या असतात, त्यांनाही कुटूंब असते. तुटपुंज्य मानधनावर काम करावे लागते. जाहिरातीचे टार्गेट, बातम्यांच्या डेडलाईन, वरिष्ठांचा दबाव, नोकरीची शाश्वती नसते, प्रसार माध्यमांची जीवघेणी स्पर्धा आदी प्रश्नाला तोंड देत ग्रामीण पत्रकार आपल्या बौध्दिक क्षमतेच्या पातळीवर सामाजिक मूल्य जपताना दिसतात, पण आजच्या मूल्यबधीर समाज व्यवस्थेत ग्रामीण पत्रकारांनी आणि प्रसार माध्यमांनी सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आपली लेखणी पुन्हा धारधार करायला हवी, कारण भविष्यात शाश्वत आणि विश्वासार्ह माध्यमांनाच समाजात सन्मान मिळणार आहे.

## निष्कर्ष

१. आजच्या मूल्यबधीर समाज व्यवस्थेला विश्वासार्ह माध्यमांची गरज आहे.
२. ग्रामीण विकासात पत्रकारांची भूमिका महत्वाची आहे.
३. माध्यमांच्या विश्वासार्हतेविषयी प्रश्न निर्माण झाला असला तरी माध्यमांनी समाज हिताचे काम पूर्णतः सोडलेले नाही.
४. ग्रामीण पत्रकारितेतील सामाजिक मूल्यांच्या संवर्धनासाठी ग्रामीण पत्रकारांना संरक्षण आणि नोकरीची शाश्वती मिळायला हवी.
५. ग्रामीण पत्रकारितेच्या मर्यादाच या क्षेत्रातील सामाजिक मूल्यातील प्रमुख अडसर ठरतात.

# संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १. कोळमकर, अनंत | 'बातमीदाराचा जाहीरनामा' | पृ.१३ |
| २. कोळमकर, अनंत | 'तत्रैव' | पृ.१३ |
| ३. भटकर,निताळे, सोरडे | 'प्रसारमाध्यमे आणि समाज' | पृ.९४ |
| ४. जोशी, श्रीपाद | 'माध्यमाची नीतीमत्ता एक संशोधन' | पृ.१३ |
| ५. जोशी, श्रीपाद | 'तत्रैव' | प्रस्तावना |
| ६. शहा, सुरेश | 'ग्रामीण पत्रकारिता' | पृ.६ |
| ७. शहा, सुरेश | 'तत्रैव' | पृ.१० |